प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २० ऑक्टोबर २०२२

**सिडकोच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्‌घाटन - विविध सेवा एकाच पोर्टलवर उपलब्ध करून देत महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली ई-प्रशासनाच्या दिशेने सिडकोचे आणखी एक क्रांतिकारी पाऊल**

सिडको महामंडळाच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्‌घाटन २० ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या शुभहस्ते सिडकोचे मुख्यालय असलेल्या सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन येथे करण्यात आले. **मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर व्यवसाय सुलभता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री यांनी बांधकाम क्षेत्राच्या उन्नतीसाठी हा पुढाकार घेण्याची घोषणा केली होती.** आपल्या बहुतांशी सेवा ऑनलाइन माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्यानंतर, ई-प्रशासनाच्या दिशेने सिडकोने टाकलेले हे आणखी एक क्रांतिकारी पाऊल आहे. या प्रसंगी **श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. शशिकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी**, विभागप्रमुख, **श्री. मधु पाटील, अध्यक्ष, एमसीएचआय, रायगड** आणि **सिडकोचे अधिकारी व कर्मचारी** उपस्थित होते.

**"व्यवसाय सुलभता पोर्टलमुळे सिडकोच्या सेवांचे सुलभीकरण, सुसूत्रीकरण आणि डिजिटलायजेशन होऊन सर्वसामान्य नागरिक, गुंतवणूकदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक अशा विविध घटकांना अधिक जलद, पारदर्शक व कार्यक्षम सेवा मिळणार आहे. तसेच यामुळे नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर या लौकिकात भर पडणार आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोने ई-प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मालमत्ता हस्तांतरण, बांधकाम परवाना, वसाहत सेवा इ. सेवा यापूर्वीच ऑनलाइन माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे नवी मुंबईतील नागरिकांना केवळ एका क्लिकद्वारे सिडकोशी संबंधित सेवांचा लाभ घरबसल्या घेणे शक्य झाले आहे. परंतु या सर्व सेवा एकाच ठिकाणी 'एक खिडकी निपटारा' (सिंगल विंडो क्लिअरन्स) पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोतर्फे व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझनेस) पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

या एकाच पोर्टलवर अर्ज सादरीकरण, अर्जांचे मूल्यमापन आणि अर्जांचा निपटारा होणार आहे. या सेवा अधिक पारदर्शक व प्रतिसादात्मक पद्धतिने पुरविणे, नागरिक आणि शासन यांच्यातील सुसंवाद वाढवणे, २४x७ तत्त्वावर सेवा पुरविणे ही सिडकोच्या व्यवसाय सुलभतेची उद्दिष्टे आहेत. सध्या व्यवसाय सुलभता पोर्टल अंतर्गत वसाहत सेवा (६४ दुय्यम सेवा), बांधकाम परवाना सेवा (०४ दुय्यम सेवा), अभियांत्रिकी सेवा (०३ दुय्यम सेवा), सर्वसाधारण सेवा (०४ दुय्यम सेवा) आणि नैना प्रकल्पा संदर्भातील सेवा (०४ दुय्यम सेवा) उपलब्ध करून दिल्या आहेत.

तसेच सदर पोर्टल नागरिकांना त्यांनी केलेल्या अर्जाची स्थिती आणि संबंधित विभागाकडून सेवा मिळण्यासाठी लागणारा कालावधीही जाणून घेता येणार आहे. विविध भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या क्यूआर कोडद्वारे व्यवसाय वापरकर्त्यांना आवश्यक ती कागदपत्रे आणि निपटाऱ्यासाठी लागणारा आवश्यक वेळ यांबाबतची अद्ययावत माहितीही सदर पोर्टलद्वारे मिळू शकणार आहे.

नागरिकांना www.cidcoindia.com/eodb पोर्टलची माहिती करून देण्याच्या उद्देशाने सिडको भवनमध्ये नागरीक सुविधा केंद्रही (सीएफसी) स्थापन करण्यात आले आहे. अशाच प्रकारची सुविधा सिडकोच्या सर्व विभागीय कार्यालयांतही उपलब्ध करून देणे नियोजित आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**